# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २३२/२०२६**

**विषय :-** **३ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाची व्दिवार्षिक निवडणूक-२०२६. दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत.**

**संदर्भ :-** **मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.बीआयई/२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/नि-१, दि.०१ ऑक्टोबर, २०२६.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, ३ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाची व्दिवार्षिक निवडणूक-२०२६ या निवडणूकीचे मतदान शुक्रवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणार आहे. सदर निवडणूकीकरिता संबंधीत मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करणेबाबत संदर्भीय पत्र निर्गमित करण्यात आले आहे. (सोबत प्रत)

त्या अनुषंगाने विद्यापीठ आस्थापनेतील संबंधीत शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांचे सदर पदवीधर/शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीचे मतदान असल्यास, त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठातील कंत्राटी तत्त्वावरील कार्यरत कर्मचारी यांनादेखील मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष सवलत देण्यात येणार आहे. यानुसार मतदान करण्याकरिता अशी सुट्टी/विशेष नैमित्तिक रजा/विशेष सवलत घेण्यापूर्वी/घेतल्यानंतर सर्व संबंधितांनी मा.विभागप्रमुख यांचेमार्फत प्रशासन शिक्षकेतर कक्ष/प्रशासन शिक्षक कक्ष यांना लेखी कळविणे आवश्यक राहील.

तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/संस्था यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांस उपरोक्त नमूद मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्याकरिता निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भीय पत्रानुसार योग्य ती कार्यवाही करावी, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**(प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 3928
दिनांक : 22 OCT 2026

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा
४. मा.संचालक/प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था

} यांना विनंती की, सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

५. सहायक कुलसचिव, जनसंपर्क कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-०७.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : बीआयई /२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/ नि-१
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२६.
Email:conduct-election@mah.gov.in

प्रति,

विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ व
अमरावती विभाग व पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ.

विषय :- ३ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६
मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत....

महोदय / महोदया,

भारत निवडणूक आयोगाच्या दि. २२ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकान्वये औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभाग या पदवीधर तसेच अमरावती विभाग व पुणे विभाग या शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे.

सदर निवडणुकीचे मतदान दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ८.०० ते सायं. ४.०० पर्यंत व मतमोजणी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२६ (मंगळवार) रोजी होणार आहे.

या निवडणुकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर/शिक्षक मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५B नुसार भर पगारी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.०६.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदवीधर/शिक्षक निवडणुकीमध्ये मतदार असलेल्या व्यक्तीला विशेष नैमित्तिक रजा जाहीर केलेली आहे, सदरचा शासन निर्णय या कार्यालयाच्या www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची रजा ही त्यांच्या अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असणार आहे.

तसेच सदर निवडणुकीकरीता मतदार असणाऱ्या खाजगी आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या मतदारांना सदर विशेष नैमित्तिक रजा लागू होत नाही. याकरीता, खाजगी आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदान करण्यासाठी २ तासांची विशेष सवलत देण्याबाबत विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या स्तरावरुन खाजगी आस्थापनांना सूचना देण्यात याव्यात. तसेच याबाबींना व्यापक प्रसिद्धी ही देण्यात यावी ही विनंती.

आपला

(अरविंद शेटे)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत:- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,
(औरंगाबाद, पुणे, नागपूर व अमरावती विभागातील जिल्हे)

D:\krushna\पदवीधर व शिक्षक मतदारसंघाची २वार्षिक निवडणूक-२०२६\विशेष नैमित्तीक रजा.docx